# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.नि.वि.वि/ २०१७–१८ /७१

**परिपत्रक:**

विषय: दिनांक २७ व २८ ऑक्टोबर २०१७ रोजी राळेगण सिध्दी, ता. पारनेर, जिल्हा अहमदनगर येथे दुसरे पर्यावरण संमेलनास प्रत्येक महाविद्यालयातील दोन प्राध्यापक सहभागी होणे बाबत व शोध निबंध पाठविण्याबाबत...

सर्व संलग्नित महाविद्यालय/संस्थांचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठाचे विभाग/संस्थांचे विभाग प्रमुख/संचालक यांना कळविण्यात येते की वृक्षमित्र आबासाहेब मोरे, अध्यक्ष निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदुषण निवारण मंडळ, मुं. पो. सुरगाव, ता. श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांनी त्यांचे दिनांक २१ ऑगष्ट २०१७ रोजीचे पत्रानुसार उपरोक्त विषयाबाबत असे कळविले आहे की, जागतिक तापमान वाढ, हवामान बदल, दुष्काळ, पाणी टंचाई आदि गंभीर समस्या व महाराष्ट्र शासनाच्या कोटी कोटी वृक्षारोपण, संवर्धन प्रचार, प्रसिध्दी व कृतीशिलता निर्माण करण्यासाठी प्राध्यापक, शिक्षक, ग्रामसेवक, समाजसेवक यांना समाजाच्या केंद्रस्थानी आणण्याची गरज लक्षात घेता दिनांक २७ व २८ ऑक्टोबर २०१७ रोजी दुसरे पर्यावरण संम्मेलन (निवासी) राळेगण सिध्दी, ता. पारनेर, जिल्हा अहमदनगर येथे आयोजित केले आहे. तसेच समाजातील कार्यरत समाजघटकांना एकत्रीत आणून वैचारिक मंथनातून प्रबोधन कृतीशिलता निर्माण करण्यासाठी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, ग्रामसेव, समाजसेवक, यांना सोबत जोडलेल्या जोडपत्रात नमूद विषयांवर शोध निबंध पाठविण्याची विनंती केलेली आहे.

तरी विद्यापीठाचे सर्व संलग्नित महाविद्यालय/संस्थांचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठाचे विभाग/संस्थांचे विभाग प्रमुख/संचालक यांना विनंती करण्यात येते की सदर बाब संबंधीत प्राध्यापकांच्या निर्दर्शनास आणावी व संमेलनात सहभागी होण्याकरिता / शोध निबंध abasahebmore1955@gmail.com या मेलवर मराठी युनिकोड मंगल व इंग्रजी टाईम्स न्यु रोमन फॉन्टमध्ये ३० सप्टेंबर २०१७ पुर्वी पाठविण्याबाबत सूचित करावे.

(डॉ दिनेश कांबळे)
प्रभारी कुलसचिव

मुंबई ४०० ०३२
१३ सप्टेंबर, २०१७

प्रति,

सर्व संलग्नित महाविद्यालय/संस्थांचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठाचे विभाग/संस्थांचे विभाग प्रमुख/संचालक.

******

प्रत माहितीकरिता सविनय रवाना:

वृक्षमित्र आबासाहेब मोरे,
अध्यक्ष, निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदुषण निवारण मंडळ
मुं.पो. सुरगाव, ता. श्रीगोंदा
जिल्हा अहमदनगर